A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संतांच्या अभंगातील विविध काव्य विषय: एक साहित्यिक परामर्श

**शोधार्थी - असावरी देगलूरकर**
मार्गदर्शक - डॉ. पौर्णिमा धुमाळे
विभाग - विद्यापीठ संगीत विभाग, पुणे एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ , पुणे

**सारांश:** महाराष्ट्रात 13 व्या शतकाच्या आधीपासून भक्ती परंपरा प्रचलित आहे. या भक्ती मार्गात विविध संप्रदाय आहेत, त्या पैकी भागवत धर्माचा प्रचार -प्रसार करणारा संप्रदाय म्हणजे वारकरी संप्रदाय. यासंप्रदायाला सामान्य जना पर्यंत पोचवण्याचे कार्य संतानी केले. त्यांनी जनसामान्यांना विठ्ठल या आराध्य दैवतेची भक्ती आणि उपासना करण्याची ओढ लावली. विविध अभंगांच्या माध्यमातून, विविध प्रकारच्या रूपकांचे दाखले देत संतांनी ही भक्तीची धारा अनेक पिढ्या सतत प्रवाहित ठेवली. आजही ७००-८०० वर्षांपासून चालत आलेली पंढरपूरची आषाढी व कार्तिकी एकादशीची वारी याचे द्योतक आहे.

संतांनी विपुल प्रमाणात अभंगांची रचना केली आहे. त्यापैकी काही निवडक संतांनी रचलेल्या निवडक अभंगांच्या काव्य विषयांवर प्रस्तुत लेखात प्रकाश टाकला आहे. साधारणपणे जनसामान्यांमध्ये प्रचारात असलेल्या लोकप्रिय अभंगांचा, अभंगांच्या विविध विषयांचा विचार यामध्ये केला आहे.

**संकेत शब्द-** भक्ती परंपरा, वारकरी संप्रदाय, अभंग, छंद, समचरण, ताटीचे अभंग, वारी, कीर्तन

**उद्दिष्ट-**

1. अभंग ही संज्ञा स्पष्ट करणे.
2. अभंगांचा ऐतिहासिक आढावा घेणे.
3. अभंगातील विविध विषयांचा साहित्यिक दृष्टीकोनातून परामर्श घेणे.
4. साहित्यिक दृष्टिकोनातून अभंगातील रूपक, उपमा, उपमेय इत्यादींचे विश्लेषण करणे.

**प्रस्तावना-**

संतांनी वैविध्यपूर्ण विषयांवर अभंग रचले आहेत. हे अभंग त्यांना वेगवेगळ्या वेळेला,वेगवेगळ्या विषयांवर स्फुरलेले आहेत. रूपाचे अभंग, काकडा आरतीचे अभंग, भुपाळ्याचे अभंग, रूपक, ताटीचे अभंग, विनंतीचे अभंग, हरीपाठाचे अभंग ,गुरुपरंपरेचे अभंग,असे नित्यपाठासाठी गायले किंवा घेतले जाणारे अभंग व इतर विषयांवर असणारे अभंग - जसे की पंढरपूर व वारी वरील अभंग,

धावा ,मानवी नातेसंबंधांवरील अभंग, विरहिणी अशा विभिन्न मुद्द्यांमध्ये काही निवडक अभंगांचा विचार प्रस्तुत लेखात केला जाणार आहे. वारकरी संप्रदायामध्ये आठवड्यातील प्रत्येक वाराचे अभंगही आपल्याला सापडतात. पंचपदी सुरू करताना जय जय राम कृष्ण हरी ने सुरुवात करून नंतर त्या त्या क्रमानेच अभंग घेतले जातात. हरीपाठाच्याही अभंगाचा क्रम ठरलेला असतो. विविध संतांचे हरिपाठ म्हणजेच ज्ञानेश्वरांचा हरिपाठ, तुकाराम महाराजांचा हरिपाठ, नामदेव महाराजांचा हरिपाठ असे विविध हरिपाठ प्रसिद्ध आहेत.

**अभंग छंद-** ज्या छंदात भंग नाही तो अभंग. ही मराठी वाङ्मयातील छंद रचना आहे. यामध्ये वृत्त,गण,मात्रा यांचा उल्लेख नाही. तज्ञांनी अभंग या छंद रचनेचे उद्गाते संत नामदेव आहेत असे प्रतिपादन केले आहे.

आपल्याला अभंग ही काव्यरचना कशी स्फुरली त्याचा दृष्टांत देण्यासाठी नामदेवांनी एक अभंगच दिलेला आहे.-

अभंगाची कळा नाही मी नेणत त्वरा केली प्रित केशीराजे|
अक्षरांची संख्या बोलीले उदंड मेरु सूप्रचंड शर आधी आदी|
सहा-साडेतीन चरण जाणावे अक्षरे मोजावी चौकचारी|
पहिल्यापासून तिसऱ्या पर्यंत अठरा गणित मोज आले|
चौकचारी आधी बोलीलो मातृका बावीसावि संख्या शेवटील |
दीड चरणांचे दीर्घ ते अक्षर मुमुक्ष विचार बोध केला|
नामा म्हणे मज स्वप्न दिले हरी प्रीतीने खेचरी आज्ञा केली ||

स्वतः श्रीहरी विठ्ठलाने स्वप्नामध्ये येऊन अशा प्रकारची छंद रचना कर आणि त्याला अभंग असे नाव दे. त्याच्या विपुल रचना कर असे नामदेव महाराजांचे गुरु विसोबा खेचर यांनी आज्ञा केली, असे नामदेव महाराजांनी प्रस्तुत अभंगात सांगितले आहे.

अभंगातील अक्षरांच्या संख्येच्या साठी अजून एक उदाहरण आहे -

मुख्य मातृकांची संख्या सोळा अक्षरे नेटक्या
समचरणी अभंग नव्हे ताल छंदोभंग
चौक पुलिता विसर्ग गण यती लघु दीर्घ
जाणे एखादा निराळा नामा म्हणे तो विरळा ||

"ओवीचे मालात्मक रूप म्हणजे अभंग"- डॉक्टर ना.ग. जोशी

वारकरी संप्रदायाचे आराध्य दैवत श्री विठ्ठल व पंढरपूरचा उल्लेख अनेक प्राचीन ग्रंथांमध्ये आलेला आहे तसेच श्री संत ज्ञानदेव संत नामदेव यांच्या ही पूर्वी आषाढी कार्तिकी एकादशीला पंढरपुरात दिंड्या सोबत संतभार जमत होता. संतांनी विपुल प्रमाणात वांग्मय रचना केलेली आहे. त्यामध्ये जनसामान्यांकडून गौरवलेला व आपलासा केला केलेला वांग्मय प्रकार म्हणून अभंग लोकप्रिय आहेत. या अभंगांमध्ये एक नैसर्गिक अंगभूत अशी लय, ठेका अंतर्भूत असतो. व संप्रदायांमध्ये गायल्या गेलेल्या अभंगांच्या सहज सोप्या चाली यामुळेही सर्व स्तरातील लोकांमध्ये अभंग लोकप्रिय असा साहित्यप्रकार व गीत प्रकारही आहे. संतांनी ज्या विविध विषयांना स्पर्श केला व वेगवेगळ्या उदाहरणांच्या, रूपकांच्या, दाखल्यांच्या माध्यमातून भक्ती अध्यात्म यांची बीजे जनसामान्यांमध्ये रोवली त्यापैकी काही विषय पुढील प्रमाणे-

- **रूपाचे अभंग किंवा विठ्ठलाच्या रूपाचे गुणांचे वर्णन करणारे अभंग** - संतांनी विविध प्रकारच्या विषयांचे अभंग लिहिले त्यामध्ये सर्वात लोकप्रिय असलेले किंवा पंचपदी मध्येआधी घेतले जाणारे अभंग म्हणजे रूपाचे अभंग. यात श्री विठ्ठल पांडुरंग किंवा श्रीकृष्ण यांच्या सगुण रूपाचे वर्णन आपल्याला पाहायला मिळते. प्रत्यक्ष दिसणाऱ्या मूर्तीचे पांडुरंगाचे समचरण, कटेवर म्हणजेच कमरेवर ठेवलेले कर म्हणजेच हात, पांडुरंगाची सावळी मूर्ती, गळ्यामध्ये असलेला कौस्तुभमणी,पांडुरंगाला नेसवलेला पितांबर, विटेवर उभा असलेला पांडुरंग, त्याचे कर्नाटकाशी असलेले नाते इत्यादींचे वर्णन आपल्याला अभंगांमध्ये पाहायला मिळते. उदाहरणार्थ-

  1. सुंदर ते ध्यान उभे विटेवरी| कर कटावरी ठेवोनिया |
  2. रूप पाहता लोचनी सुख झाले हो साजणी | तो हा विठ्ठल बरवा तो हा माधव बरवा |
  3. सावळे रुपडे चोरटे चित्ताचे उभे पंढरीचे विटेवरी |
  4. पांडुरंग कांती दिव्य तेज झळकती रत्नकिळ फाकती प्रभा |
  5. राजस सुकुमार मदनाचा पुतळा रवी शशि कला लोपलिया |
  6. रूपे सुंदर सावळा गे माये सावळा गे माये |इत्यादी

- **पंढरपूर गाव व आळंदी ते पंढरपूर वारी यावरील अभंग** - संत ज्ञानेश्वर यांच्या काळाच्या आधीपासून आषाढी एकादशी व कार्तिकी एकादशी साठी आळंदी, देहू व इतर गावाहून विविध संतांच्या पादुका पालखीतून पंढरपूरला नेण्याची प्रथा सुरू आहे वारी हा शब्द येरझारा या अर्थाने वापरला जातो. तसेच दरवर्षी नित्यनेमाने या पालख्यांसोबत भक्तीभावाने पायी पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांना वारकरी असे संबोधले जाते. श्रीक्षेत्र पंढरपूर, श्री विठ्ठलाचे मंदिर, रुक्मिणी माता, मंदिराच्या सुरुवातीस असलेली नामदेव पायरी, तसेच ज्याला अतिशय प्रेमाने

सर्व वारकरी आलिंगन देतात असा गरुड खांब,सर्व वारकरी जिच्या पवित्र जलात स्नान करून आपले पापभंग करतात व पुण्य वृद्धिंगत करतात अशी चंद्रभागा नदी या सर्वांचे वर्णन असलेले अभंग म्हणजे संतांनी सर्वांना वारीचा दिलेला अनुभवच आहे . याची काही उदाहरणे पुढील प्रमाणे -

1. तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल देव विठ्ठल देवपूजा विठ्ठल |
2. पंढरीची वारी जयाची कुळी त्याची पाय धुळी लागो मज |
3. माझे माहेर पंढरी आहे भिवरेच्या तीरी |
4. आम्ही विठ्ठलाचे वारकरी | ठाई ठाई विठ्ठल ठाई ठाई पंढरी |
5. जाता पंढरीसी सुख वाटे जीवा |आनंदे केशवा भेटताची |

- **धावा-** 'आळंदी पंढरपूर वारीच्या दरम्यान शेवटच्या टप्प्यात माळशिरस या गावावरून निघून पंढरपूरच्या अलीकडे असलेले वेळापूर हे गाव लागते. त्या गावाच्या आधी उतार लागतो तिथून सर्व वारकरी धावत सुटतात त्याला धावा असे म्हणतात. असे समजले जाते की तेथून पंढरपूरच्या मंदिराचा कळस दिसतो व विठ्ठलाच्या भेटीची आस लागून सर्व वारकरी घाईने त्याला मिठी मारण्यासाठी धावत सुटतात व त्या वेळेला पुढील अभंग घेतला जातो' , *[1]

सिंचन करिता मूळ वृक्ष ओलावे सकळ
नको पृथकाचे भरी पडो एक सार धरी
पान चोऱ्यांचे दार वरील दाटावे ते थोर
वरा झाला राजा मग आपल्या त्या प्रजा
एक आतुडे चिंतामणी फिटे सर्व सुखधनी
तुका म्हणे धावा पुढे पंढरी विसावा ||

- **मानवी नातेसंबंध व प्रापंचिक विषयांवर भाष्य करणारे अभंग-** संसारिक विषयांवरचे अभंग- प्रापंचित जीवनामध्ये संसारामध्ये आलेले अनुभव, यांचे चित्र संतांनी अभंगांमध्ये केले आहे जनसामान्यांना पडणारे अनेक प्रश्न व त्यांचे समाधान या अभंगांमधून होते घरामधील नातेसंबंध आई, बहिण, पती, मुलं, सासू-सासरे यांच्या संदर्भामध्ये अनेक अभंग लिहिले आहेत. तुकाराम महाराजांच्या चरित्रामध्ये आपल्याला दिसते की एकाच वर्षी त्यांचे वडील, त्यांची आई, तुकाराम महाराजांची पहिली पत्नी यांचे निधन होऊन त्यांच्यावर खूप मोठे आघात झाले त्या काळा मध्ये या आघातांचा त्यांनी कशा पद्धतीने अर्थ घेतला हे पुढील अभंगावरून समजू शकते.

1. "बाप मेला न कळता नव्हती संसाराची चिंता | "
"बाईल मेली मुक्त केली | देवे माया सोडविले |"
पोर मेले बरे झाले | देवी माया विरहित केले |"
माता मेली मज देखता | तुका म्हणे हरली चिंता || "

कुटुंबावर झालेले आघात तसेच प्रिय व्यक्तींचा मृत्यू यामुळे भगवद चिंतनामध्ये किंवा भक्तीमध्ये थोडीही कसर त्यांनी येऊ दिली नाही .उलट या गोष्टींमुळे माझा परमेश्वराशी अधिक जवळचा संबंध येतो आहे, मी जास्तीत जास्त परमेश्वर चिंतनात घालवतो आहे व परमेश्वराच्या अधिक जवळ आहे असेच तुकाराम महाराजांनी सांगितले.

2.' बरे झाले देवा बाईल कर्कश्शा | बरी हे दुर्दशा जनामध्ये |
' बरे झाले जगी पावलो अपमान | बरे गेले धन ढोरे गुरे |
' बरे झाले नाही धरीली लोक लाज| बरा आलो तुज शरण देवा |
तुका म्हणे बरे व्रत एकादशी | केले उपवासी जागरण ||

याचबरोबरच आदर्श प्रपंच संसार कसा करावा याचेही उत्तम दर्शन संत आपले अभंगातून घडवतात व आदर्श जीवन कसे जगावे याचा परिपाठ ही आपल्याला अभंगाच्या माध्यमातूनच घालून देतात जसे की -

जोडोनिया धन उत्तम व्यवहारे उदास विचारे वेच करी
उत्तमाची गती तो एक पावेल उत्तम भोगीला जीव खाणी
पर उपकारी नेणे परनिंदा पर स्त्रिया सदा बहिणी माया
भूतदया गाई पशुंचे पालन तान्हेल्या जीवन वना माझी
शांतीरुपी नव्हे कोणाचा वाईट वाढवी महत्त्व वडिलांचे
तुका म्हणे हेचि आश्रमाचे फळ परमपद बळ वैराग्याचे ||

**निसर्ग वर्णन पर अभंग -**

शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य याचा समतोल राहण्यासाठी माणसाने निसर्गाशी जवळीक साधावी आपला आहार विहार जास्तीत जास्त नैसर्गिक ठेवावा. वनातील पशुपक्षी, झाडे -वेली यांच्यासोबत वेळ घालवावा. त्यामुळे मानसिक शांतता लाभते. हे सांगणारा तुकारामां महाराजांचा," वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे |पक्षीही सुस्वरे आळविती|" हा अभंग सर्वपरिचित आहे.

तसेच परमेश्वराची अगाध लिला आणि त्याचे सार्वभौमत्व सांगण्यासाठी संत अनेक रूपकांच्या माध्यमातून हे सांगतात की कोणतेही कार्य करण्याचे श्रेय तुम्ही स्वतःकडे घेऊ नका तसेच संसारात राहून पण जसे पाण्यामध्ये कमळ असते पण कमळाच्या पानाला पाणी चिकटून राहत नाही तसेच संसाराला चिकटून राहू नका यासाठी कमळाचे रूपक संत देतात

सत्यवादी करी संसार सकळ| अलिप्त कमळ जळी जैसे |
घडे ज्या उपकार भूतांची ते दया |आत्मस्थिती तयार अंगी वसे |
पाषाणाचे पोटी बैसला दुर्दर| तया मुखी चारा कोण घाली |
पक्षी अजगर न करी संचित| तयासी अनंत प्रतिपाळी ||

कुटुंबवत्सल माणसाने प्रपंच करावा पण त्यात गुंतून पडू नये यासाठी संत एकनाथांनी पक्ष्यांचा दृष्टांत दिला आहे

पक्षी अंगणी उतरती ते का गुंतून राहती
तैसे असावे संसारी जोवरी प्राचीनची दोरी ||

- **स्त्री संतांचे अभंग** - महाराष्ट्रात अनेक स्त्री संतांनी परमार्थ मार्गावर चालताना अभंगांची रचना केली आहे. यात संत मुक्ताबाई, संत जनाबाई , संत कान्होपात्रा इत्यादी अनेक संत स्त्रिया येतात .त्यात पंढरपुरात संत नामदेव यांच्या घरी राहणारी त्यांची शिष्या संत जनाबाई, स्वतः चा " नामयाची जनी", असाच उल्लेख करते. जनाबाईने विठ्ठलाला- पांडुरंगाला आपले सर्वस्व मानले होते तोच तिचा सखा, बंधू, माता-पिता सर्व काही होता. संत नामदेवांच्या घरी घरातील सर्व कामे करताना, म्हणजेच झाडलोट, सडा सारवण, गौऱ्या थापणे ,जात्यावर दळण करणे अशी सर्व कामे करताना, पांडुरंग जनाबाईला मदत करायचा असे जनाबाईंच्या अभंगावरून आपल्याला पाहायला मिळते. ही कामे करतानाचे स्त्री विश्वाशी संबंधित अभंग संत जनाबाईंनी लिहिलेले आहेत.

  उदाहरणार्थ:

  1. दळीता कांडिता तुज गाईन अनंता |
  2. जनी जाय पाणीयासी मागे धावेऋषिकेशी |
  3. जनी उकलिते वेणी तुळशीचे बनी |
  4. झाड लोट करी जनी |केरभरी चक्रपाणी
  5. ये ग ये ग विठाबाई माझे पंढरीचे आई |

**दुसऱ्या स्त्री संत म्हणजे संत ज्ञानेश्वरांची धाकटी बहीण मुक्ताबाई**, चौदाशे वर्ष तपश्चर्या केलेल्या चांगदेवांची आध्यात्मिक गुरु बनून त्यांना उपदेश करणे ही त्यांची ज्येष्ठता होती. चांगदेव पासष्टी या ग्रंथाचा अर्थ मुक्ताबाईंनी त्यांना उलगडून दाखवला. तसेच समाजाच्या जाचाला कंटाळून जेव्हा ज्ञानेश्वर स्वतःला झोपडी मध्ये बंद करून घेतात, त्यावेळेला त्यांना सुद्धा मुक्ताबाईंनी बाहेर येण्यासाठी विनवणी केली व जगदोद्धारासाठी उपदेश केलेला आहे. हे उपदेशपर जे अभंग आहेत, ते अभंग ताटीचे अभंग म्हणून प्रसिद्ध आहेत . ते पुढील प्रमाणे-

1. योगी पावन मनाचा साहे अपराध जनांचा
विश्व रागे झाले वनी संती सुखी व्हावे पाणी
शब्दशास्त्रे झाले क्लेश संती मानावा उपदेश
विश्व पट ब्रम्ह दोरा ताटी उघडा ज्ञानेश्वरा |

2. सुखसागर आपण व्हावे ,जग बोधे निववावे |

असे मुक्ताबाईंनी रचलेले ताटीचे एकूण 42 अभंग प्रसिद्ध आहेत .

- **विरहिणी** - ' गोपी हे जिवावस्थेचे प्रतीक तर कृष्ण परमात्मा स्वरूप शिवावस्थेचे प्रतीक. परमात्मा दर्शनापासून दुरावलेल्या आणि त्याच्या भेटीसाठी आतुर झालेला जीव हाच कोणी विरहणी आहे त्या भेटीपासून दुरावल्यामुळे तिच्या मनावरची अवस्था काय झाली याचे विरह भक्ती दर्शन म्हणजेच विरहणी' *2.

**उदाहरणार्थ -** संत ज्ञानेश्वरांच्या काही विराण्या -

a) घनु वाजे घुण घुणा वारा वाहे रुणझुणा
भवत तारकु हा कान्हा भेटवा का |
चांदू वो चांदणे चाफे वो चंदने
देवकीनंदनेवीण नावडे वो ||
b) पैल तो गे काऊ कोकताहे| शकुन गे माय सांगत आहे ||
c) अवचिता परिमळू| झुळकला अळू माळू |
मी म्हणे गोपाळू आला गे माय|

या विरहणींमध्ये ज्ञानेश्वरांनी त्यांच्या मनातील प्रेमस्वरूप परमात्म्याविषयीची ओढ व त्याच्या विरहामुळे झालेली त्याच्या प्रियतमेची अवस्था याचे सुंदर वर्णन केलेले आहे. यात श्रीकृष्ण परमात्मा म्हणजे प्रिय पुरुष किंवा परमपुरुष व आपण म्हणजे त्याची प्रिय सखी असे वर्णन पाहायला मिळते.

तर संत नामदेवांच्या काही विरहिणींमध्ये संसारामध्ये रमलेली गोपिका, तिचा संसार त्याग करून ती परमेश्वराच्या भेटीची आस मनामध्ये बाळगून आहे, असे चित्रण दिसते.

संसार परजनी |दूर दिधले मज साजणी
द्वारकापूर पाटणे माझे माहीयेर
थोर उत्कंठा मनी वाटपाहे प्रतिदिनी
मज नेत का न कोणी |तया माहीयेरा ||

यात संत नामदेवांनी परमेश्वराचा भक्त साधक, आपले माहेर म्हणजे पंढरपूर येथे जाण्यासाठी आतुरलेली असते. यामध्ये पतीव्रता स्त्री म्हणजे संसारामध्ये रममाण झालेला जीव आणि माहेर म्हणजे परमात्म्याचे ठिकाण अशा पद्धतीचे रूपक आपल्याला पाहायला मिळते.

संत निळोबारायांची विरहिणी -

माझी मजची तो पडयेली भुली |
गेले मर्यादा विसरूनी आपुली
त्याची अणूमात्र पडताची साऊली|
वृत्ती तदाकार होऊनिया ठेली वो ||

यामध्ये संत निळोबांनी सतत भगवतचिंतनामध्ये असलेल्या विरहणीची व्यथा मांडली आहे, आपल्या प्रियतमाचा सतत विचार करून त्याच्याच रूपाची जाणीव सतत होऊन त्या विरहीणीला स्वतःचाच विसर पडलेला आहे, ती व तिची वृत्ती त्या प्रियतमाशी तद्रूप व तदाकार होऊन गेलेली आहे .

**निष्कर्ष -**

1. रूपाचे वर्णन असलेल्या अभंगामुळे सगुण भक्तीची वाट सुकर झाली
2. गूढ असे अध्यात्मिक ज्ञान सोप्या शब्दांमध्ये मांडल्यामुळे अवघड असलेले ज्ञान लवकर उलगडते
3. स्त्री वर्गाशी निगडित असलेल्या अभंगांमुळे स्त्रियांना हे विषय जवळचे, आपले वाटूलागले.

4. निसर्गावरील अभंगांमधून निसर्गातील, चराचरातील परमात्मा कसा पाहावा याचे मार्गदर्शन मिळते.

5. सामान्यजनाना जवळचे वाटणारे विषय घेऊन आपले अनुभव, जीवनाचे तत्वज्ञान संतांनी आपल्या साहित्य वाङ्मयम्हणजेच अभंगाच्या माध्यमातून सामान्यांपर्यंत पोहोचवले.

6.अभंग या छंदाला त्याची अंगभूत नैसर्गिक लय व ठेका असतो. तसेच अभंगांच्या साध्या सोप्या चाली यामुळे सर्व स्तरातील समाज व जनसामान्य अभंगाकडे आकर्षित झाले, अभंगाशी जोडले गेले.

**संदर्भ -**

1. देखणे, डॉ.रामचंद्र, वारी:स्वरूप आणि परंपरा, पद्मगंधा प्रकाशन 2007 पृष्ठ क्रमांक 40
2. देखणे, डॉ. रामचंद्र, गौळण: वांग्मय आणि स्वरूप पृष्ठ क्रमांक79,

**संदर्भसूची -**

1. देखणे,डॉ. रामचंद्र, गौळण : वांग्मय आणि स्वरूप, विश्वकर्मा पब्लिकेशन्स, पुणे, 2021,
2. देखणे, डॉ. रामचंद्र ,वारी स्वरूप आणि परंपरा ,पद्मगंधा प्रकाशन , 2007
3. दातार, डॉ. मुकुंद वारकरी संप्रदायाची प्रस्थानत्रयी, स्नेहल प्रकाशन, प्रथम आवृत्ती 1930, जुलै 2018
4.पानसरे, कृष्णाजी ,वारकरी भजनी मालिका, श्री ज्ञानेश्वर वाचन मंडळ ट्रस्ट, पुणे, 2017,
5. सरश्री, संत तुकाराम चरित्र व चिंतन, तेजज्ञान फाउंडेशन.